सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

५०

# मासिक नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ९ वे : अंक ११

फेब्रुवारी २०२४

स्वागतमूल्य ₹. 30/-



राम आले अयोध्यापुरी
चला करूया दिवाळी साजरी
एकमुखाने बोले वैखरी
अभिमान भरला हृदयांतरी
पाचशेहे वर्षांचा लढा
रक्तरंजित इतिहास जरी
धर्मांधांच्या छाताडावर
रोवले पाय मंदिरी
हिंदू एकतेची गगनभरारी
जय श्रीराम। जय श्रीराम।
नारा दुमदुमला जगभरी
चला करूया दिवाळी साजरी
श्रीराम आले अयोध्यापुरी ।।

प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## कोल्हापूर चित्पावन संघ आणि मंगलधामच्या वतीने

# सूर्य पूजनाने धुंदुरमास उत्साहात





कोल्हापूर चित्पावन संघ, ब्राह्मण सभा करवीर आणि समस्त ब्राह्मण संस्था यांच्या वतीने रविवारी सकाळी ७ वाजता पेटाळा मैदान येथे धुंदुर्मास सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी पहाटे श्री सूर्यपूजा, सूर्यसुक्त पठण यांसारखे धार्मिक विधी संपन्न झाले.

सूर्याचे मानवी आयुष्यातील महत्त्व, या थंडीच्या काळात सकाळी उष्ण पदार्थ सेवनाचे उपयोग, यांसह भारतीय परंपरेतील सूर्याचे तसेच धुंदुर्मासाचे महत्त्व यावेळी विषद करण्यात आले. स्वागत मकरंद करंदीकर, प्रास्ताविक श्रीकांत लिमये यांनी केले. प्रमुख उपस्थिती अभिनेते विघ्नेश जोशी यांची होती. यावेळी संतोष कोडोलीकर, उद्योजक नितीन वाडीकर, दिलीप गुणे, बन्सी चिपडे, ॲड. राजेंद्र किंकर, ओंकार गाडगीळ, विश्वास केळकर, प्रकाश पत्की आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अभिनेते विघ्नेश जोशी यांनी नाट्य-संगीत क्षेत्रातील जुने किस्से-आठवणी यांना उजाळा दिला. यामध्ये राम गणेश गडकरी यांच्यापासून ते दादा कोंडके, बाबुजी, गदीमा यांच्या आयुष्यातील किस्से, कट्यार काळजात घुसली नाटकातील जुन्या गोष्टी यांची माहिती दिली. काही प्रसिद्ध गाण्याच्या पंक्तीही त्यांनी सादर केल्या.

नाट्य-संगीत क्षेत्रातील अनेक जुन्या कलाकारांच्या आठवणी त्यांनी मांडल्या. यानंतर धुंदुर्मासात आयुर्वेदामध्ये सांगितल्याप्रमाणे सकाळच्या आहाराचे महत्व विषद करण्यात आले. यामध्ये मूग, वांगे, गाजर, वाल, लोणी, तूप, तीळ, गूळ या पदार्थांनी तयार केलेल्या प्रसादाचे वाटप उपस्थितांना करण्यात आले. पौरोहित्य स्वप्नील मुळ्ये यांनी केले. आभार उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी केले.

यावेळी दि न्यू एज्युकेशन सोसायटीचे प्रभाकर हेरवाडे, सचिन जनवाडकर, मिलींद पावनगडकर, राम टोपकर, जयंत हिरळीकर, केदार जोशी, नंदकुमार मराठे, किरण जोशी, डॉ. उदय कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. परशुराम चषक कमिटी, ब्राह्मण सभा करवीर-मंगलधाम संचालक मंडळ व स्टाफ, चित्पावन संघाचे सर्व संचालक, सल्लागार व सर्व स्टाफ, परशुराम नागरी सह. पतसंस्थेचे अध्यक्ष मुकुंद गोरे, माधव करंदीकर व स्टाफ तसेच 'वुई फॉर अवर्स' चे निनाद खरे, क्षितीज गोरे, प्रशांत करंदीकर, सौरभ पाटणकर, निखील जोग, अमेय गोखले, महेश पटवर्धन, अमित आपटे, महेश कुंटे, मंदार कुंटे, संतोष साने यांचे सहकार्य लाभले.



## सैनिकांसाठी मदत करा - विघ्नेश जोशी

रविवार, दि. ७ जानेवारी रोजी सामुदायिक धुंदूरमास सोहळा कोल्हापूर चित्पावन संघ व ब्राह्मण सभा करवीर-मंगलधाम आणि इतर ब्राह्मण संस्थांनी आयोजित केला होता. सुप्रसिद्ध अभिनेते मा. श्री. विघ्नेश जोशी यांनी केलेल्या 'सैनिकांसाठी मदत करा' या आवाहनाला आपल्या ज्ञाती-बांधवांनी उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी जी रक्कम जमा झाली तो निधी सैनिकांच्या 'वीर सेनानी फाऊंडेशन' या खात्यावर जमा करण्याचा कार्यक्रम रविवार, दि. १४ रोजी सायंकाळी ५ वाजता कोल्हापूर चित्पावन संघ येथे आयोजित केला होता.



## पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत गंधार जोग यशस्वी

तरुणाईमध्ये अतिशय मानाच्या समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे आयोजित पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूरच्या 'जंगल जंगल बटा चला है' या एकांकिकेला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचे बक्षीस मिळाले. संघास ४००१/- रुपयांचे रोख पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रशस्तिपत्र, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे आणि अभिनय नैपुण्याचे बक्षीस गंधार जोग याला मिळाले आहे. नवस्नेह आणि चित्पावन संघ परिवारातर्फे गंधार जोग आणि त्याच्या टीमचे अभिनंदन !

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष ९ वे : अंक ११ : फेब्रुवारी २०२४

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) संपादकीय /४
२) भ्रमनिरास /५ - सौ. कमल हर्डीकर
३) हिवाळ्यामध्ये तिळाचे महत्त्व /८
- डॉ सुश्मिता गाडगीळ
४) हिंदू शब्दाची व्युत्पत्ती /९
५) माझी बँकेतील मुशाफिरी/ १०
- श्रीकांत शिंत्रे, शब्दांकन : सौ. ज्योत्स्ना शिंत्रे
६) मुलांचे पान / १२
७) ज्ञानसूर्याची सावली /१४ - सौ. मंजुश्री गोखले
८) मुस्लिम स्त्री कलाकार /१६ - प्रकाश गानू
९) सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' / १७
- सौ. मंजुश्री गोखले
१०) राममंदिर – एक रक्तरंजित इतिहास / १८
- श्री. संपत कौंदरे
११) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष) 0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611



**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. १९ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

कसे आहात? धुंधुरमासाच्या आठवणी अजून ओल्या आहेत तोवर जानेवारी महिना संपला सुद्धा. पण धुंधुरमासाचा कार्यक्रम मात्र दृष्ट लागण्यासारखा झाला ! अर्थात त्यातही काही नकसखोर व्यक्ती होत्या आणि आपण पैसे दिलेत हा ताठा दाखवत हिंडत होत्या. एकीला तर मीच झापलं. अशा नकसखोर माणसांना टाळण्यासाठी काहीतरी कॅटेगिरी लावली पाहिजे. अर्थात, नकसखोरपणा हा काही कपाळावर लिहिलेला नसतो म्हणा ! आता पुढच्या वेळी बघू. असो.

आम्ही नवस्नेहमधून काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न नेहमीच करत असतो. मात्र या अंकात 'राममंदिराचा रक्तरंजित इतिहास' हा महाजालावरून श्री. संपत कौंदरे यांचा आलेला लेख आम्ही मुद्दाम घेतला आहे. अंक हातात पडेपर्यंत श्रीराम प्रभू मंदिरात विजरामान झाले असतील. पण तरीही राम मंदिर बनण्यामागे किती जणांचे बलिदान आहे, हे सर्वांना कळले पाहिजे म्हणून हा लेख कटाक्षानं अंकात घेतला आहे. त्याचबरोबर या अंकात बँकेत काम करताना आलेले विचित्र अनुभव आपल्याला सांगतायत मुंबईचे श्री. श्रीकांत शिंत्रे. शिवाय नेहमीची सदरे आहेतच. मित्रांनो, हे लेख तुम्हाला कसे वाटले हे मात्र नक्की कळवा. तुमच्या सूचनांचे स्वागतच आहे. मित्रांनो, राम मंदिर ही आपली हिंदूंची अस्मिता ! तीच आत्तापर्यंत पायाखाली चिरडली जात होती. म्हणूनच हा सोहळा इतका भव्यदिव्य होणार आहे ना, की दाही दिशांना कळलं पाहिजे की नरसिंह फक्त आमच्या पुराणकथेतच नाहीत, तर प्रत्येक हिंदूच्या उरात हा नरसिंह वसलेला आहे. आणि आता तो जागा झाला आहे. मला फक्त एवढंच वाटतं की, 'सो व्हॉट' असं विचारणाऱ्या आजच्या युवा पिढीमध्ये सुद्धा, ही अस्मिता जागवण्याची गरज आहे. कारण आज करिअरच्या मागे धावणाऱ्या या पिढीला धर्म ही दुर्लक्ष करण्यासारखी बाब वाटते आणि हेच घातक ठरतय ! हिंदू धर्माची टिंगल करत मिशनऱ्यांनी आपला धर्म पसरवला. तिथेच या विचाराचा पाया आहे. आणि हा पाया उदध्वस्त करण्यासाठी आणि स्वधर्माविषयी अस्मिता जागवण्यासाठी हे राम मंदिर निर्माण होणं अत्यंत आवश्यक आणि अभिमानास्पद आहे. भविष्यातील देदिप्यमान भारताचा हा पाया आहे !

मित्रांनो, तो भारत आता दूर नाही. श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा कितीतरी वर्षे आता गाजत राहील. सात वर्षाच्या रामाची ही गोंडस मूर्ती आहे. सात या आकड्यालाही फार अर्थ आहे. सात खंडांवर राज्य करणारा, सात स्वरांचा, सात रंगांचा, सात समुद्रांचा, सात नद्यांचा स्वामी असलेलं हे सात वर्षाचं बालक म्हणजे उधम मचानेवाला छोरा! उधम म्हणजे हलकल्लोळ ! उपद्व्याप, पराक्रम ! सातव्या वर्षी सगळ्या संकटांवर मात करून रामलल्ला स्वगृही विराजमान झाले आहेत ! आता पुढची सगळी वर्ष ही कर्तृत्वाची, पराक्रमाची आहेत, हाच तर संकेत आहे ! आपण प्रतिक्षा करूया ! थांबते !

शेवटी हेच खरे की

**मुद्दई लाख बुरा चाहे, तो क्या होता है,**
**वही होता है, जो मंजुरे 'श्रीराम' होता है ।**

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**
**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

श्रीधरचा पंचाहत्तरीचा सोहळा पार पडून तीन आठवडे उलटून गेले तरी वंदनाच्या मनावरचं गारूड अजूनही दूर होत नव्हतं. पत्नी म्हणून श्रीधरनं त्या सोहळ्यात आपल्याविषयी काढलेले शब्द वंदनाच्या मनात रूंजी घालत होते. आयुष्याच्या अखेरच्या वळणावर श्रीधरच्या शब्दांनी वंदनावर सुखाची बरसात केली होती. त्यामुळे घरातील प्रत्येक गोष्ट साहजिकच पूर्वीपेक्षा समाधानाने आणि कृतार्थतेने वंदनाकडून केली जाऊ लागली. वंदना नोकरीतून निवृत्त झाल्यावर सहा महिन्यात मोठा मुलगा प्रथमेशचं लग्न झालं. त्याची पत्नी नेहा हिची नोकरीही सोलापुरातच. बदली होऊन सोलापूर सोडण्याची गरज दोघांनाही नव्हती. त्यामुळे मुलगा-सून दोघंही कायम आपल्याबरोबर राहणार या विचारानेही वंदना मनोमन सुखावली. श्रीधर अगदी मोजकं बोलणारे. खरं तर अबोलच. त्यामुळेच बऱ्यापैकी बोलघेवडी असलेली वंदनाही तिच्या नकळत खूप कमी बोलू लागली होती.

घर आणि नोकरी या दोन्ही आघाड्या यशस्वीपणे सांभाळताना किती ओढाताण होते याचा अनुभव असणाऱ्या वंदनाने आपल्या सुनेला घरगुती जबाबदाऱ्यांपासून संपूर्णपणे मुक्त ठेवायचं असं मनोमन ठरवलं होतं आणि त्यानुसार गेली बारा वर्षे वंदना वागत होती. सकाळच्या चहा-नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत प्रत्येक गोष्ट नेहाला विनासायास मिळत होती. ज्या ज्या गोष्टी आपण करू शकलो नाही, त्या सर्व गोष्टी नेहाला मिळाव्यात यासाठी वंदना जाणीवपूर्वक प्रयत्न करत असे. माहेर-सासर दोन्ही एकाच गावात असेल तर माहेरी जाऊन निवांत राहता येत नाही, म्हणून ती शनिवार-रविवार जोडून सुटी आली तर प्रथमेश-नेहाला छोट्या ट्रिपला आग्रहाने पाठवत असे. आज रात्री आम्ही दोघेही जेवणार नाही त्यामुळे तुम्ही दोघं बाहेर जेवायला जा. तेवढाच तुम्हाला बदल होईल असंही वंदना आग्रहाने सांगत असे. सासूबाई-मामंजी वगैरे न म्हणता प्रथमेश हाक मारतो त्याप्रमाणे मला माई आणि श्रीधरना अप्पा असंच तू म्हणत जा असंही त्यांनी नेहाला आग्रहाने सांगितलं. लग्नानंतर तीन वर्षांनी प्रथमेश-नेहानं दिलेली सुयशच्या रूपातील नातवाची भेट तर वंदनाने विलक्षण आनंदाने स्वीकारली होती. खरं सांगायचं तर सर्व दृष्टीनी आणि सर्व बाजूंनी वंदना आजीनं नातवाचा ताबा घेतला होता.

दिवस पळत होते. श्रीधरनी वयाच्या पंचाहत्तरीत प्रवेश केला. प्रथमेश-नीता या बहिणी-भावंडांनी आपले वडील अप्पांची पंचाहत्तरी साजरी करण्याचा निर्णय घेतला. आजकालच्या रितीप्रमाणे एखादा कार्यक्रम सरप्राईज म्हणून करण्याची प्रथा आप्पांना आजिबात रुचणार नाही, याची जाणीव असल्याने, 'आप्पा, मी आणि नीताने तुमची पंचाहत्तरी करण्याचे ठरविले आहे. कृपया नाही म्हणू नका.' अशी विनंती केली. यावर आप्पा म्हणाले,

'अरे, मी नकार कशासाठी देऊ? जरूर तुमच्या मनाप्रमाणे कार्यक्रम ठरवा. पण त्यासाठी कोणतंही कार्यालय घ्यायचं नाही. बाहेरचे कुणीही बोलवायचे नाहीत. माझ्या-वंदनाच्या मामे, आते, मावस, चुलत भावंडांना आग्रहानं निमंत्रण द्या. नेहा, नीता इ. चेही नातेवाईक जरूर येऊ देत. सर्व कार्यक्रम आपल्या या वास्तूतच व्हावा असं मला वाटतं. त्यासाठी घरासमोरच्या मोकळ्या जागेत छोटासा मांडव घालावा. ज्या घरात माझ्या आई-वडिलांनी आपल्या आयुष्याची अखेरची पंधरा वर्षे अगदी आनंदात आणि सुखा-समाधानात घालवली. त्याच वास्तूत माझी पंचाहत्तरी साजरी व्हावी अशी माझी मनापासूनची इच्छा आहे. संपूर्ण कार्यक्रमात भपका, दिखाऊपणा शक्यतो नसावा.

आप्पांच्या मनाप्रमाणेच प्रथमेश-नीतानं संपूर्ण सोहळा पार पडण्यासाठी नियोजन केलं.

बघता बघता पंचाहत्तरी सोहळ्याचा दिवस उजाडला. मे महिना असल्याने नीता, जावई आणि नातवंडं चार दिवस आधीच आली होती. सारं घर चैतन्यमय झालं होतं. अप्पांना पंचाहत्तर दिव्यांनी औक्षण करण्याआधी, वयाची पंचाहत्तरी पार केलेले किंवा अगदी पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अप्पा आणि माईंच्या बहिण-भावंडांचा शाल-श्रीफळ आणि त्यांची प्रत्येकाची आवड-निवड लक्षात घेऊन त्याप्रमाणे छोटीशी वस्तू देऊन सत्कार केला. त्यामुळे साहजिकच

आप्पा-माई दोघेही खूप सुखावले. अप्पांचं औक्षण झाल्यानंतर ज्याला भाषण म्हणता येणार नाही, अशा काहीशा मनमोकळ्या गप्पांचा, मनोगतांचा कार्यक्रम सुरू झाला. एकूण या सर्व मनोगतांमध्ये अप्पा आणि माईंच्या घराशी असलेलं नातं अधिक दृढ होण्यासाठी प्रामुख्यानं माईंचा स्वभाव कारणीभूत आहे आणि अप्पा अबोल असले तरी त्यांची देहबोली घरी येणाऱ्या प्रत्येक नातेवाईकाचं अगदी मनापासून स्वागत करत आहे आणि तुमच्या येण्यानं मला, या घराला खूप आनंद झाला आहे असंच अगदी आवर्जून सांगत असते, असा भाव जवळजवळ प्रत्येकाकडून व्यक्त केला गेला.

यानंतर अप्पांना 'अरे, आज तरी बोल ! एकामागून एक वाक्यं तू बोलू शकतोस हे आम्हाला पहायचं आहे. हा दुर्मीळ योग तुझ्या सहस्त्रचंद्रदर्शनापर्यंत पुन्हा मिळणार नाही, त्यामुळे कांहीतरी कां होईना मनातलं बोल रे ! या सर्वांच्या आग्रहाखातर आप्पा, कांहीसे संकोचून बोलू लागले -

'हा सर्व सोहळा एखाद्या कार्यालयात केला असता तर तेथील सोयीसुविधांमुळे कोणाला त्रास, दगदग झाली नसती. माझ्या आग्रहामुळेच केवळ हा समारंभ या वास्तूत करावा लागला. गेले चार दिवस मी पाहतो आहे, प्रथमेश, नेहा, नीता, जावईबापू आणि माझी सर्व नातवंडं अतिशय आनंदानं सर्व नियोजन आणि त्यासाठी करावी लागणारी धावपळ करत आहे. यासाठी मी या सर्वांचं अगदी मनापासून कौतुक करतो आणि त्यांच्या भावी आयुष्यासाठी खूपखूप शुभाशीर्वाद देतो.

येणाऱ्या डिसेंबरमध्ये आमच्या लग्नाला सत्तेचाळीस वर्षे पूर्ण होतील. ही सर्व वर्षे सर्व कंगोऱ्यांनी अत्यंत सुरळीत पार पडली. याचं संपूर्ण श्रेय मी माझी सहचारिणी वंदनाला देतो ! माझ्या आई-वडिलांनी आम्हा भावंडांसाठी, आमच्या शिक्षणासाठी, आमच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्य खूप कष्टानं काढलं. कायम तीन खोल्यांच्या अनेक गैरसोयी असलेल्या भाड्याच्या घरात आमच्यासह ते आनंदात राहिले. माझ्या आईची स्वत:च्या घरात राहण्याची खूप इच्छा होती. सोलापूरसारख्या शहरात जागा घेऊन त्यावर घर बांधणं, माझ्या एकट्याच्या मिळकतीवर कठीणच होतं, पण वंदनाच्या नोकरीमुळे मिळालेलं आर्थिक पाठबळ आणि संसाराच्या सर्व आघाड्यांवर तिनं केलेली काटकसर यामुळेच ही वास्तू आम्ही उभी करू शकलो. विशेष म्हणजे या वास्तूत आई बाबा सुमारे पंधरा वर्षे अगदी सुखासमाधानात राहिले ! खास बाब म्हणजे वंदनाची निकोप आणि निरोगी तब्बेत ! बाळंतपणासाठीच काय ती दवाखान्यांत गेली. एरवी तिला दवाखान्यांत नेलं किंवा तिच्यासाठी औषध, गोळ्या आणल्याचं मला आठवत नाही. अगदी आजही!

हे सारं ऐकत असताना वंदनाचं मन खूप मागं गेलं. लग्नाला सहा महिने झाले होते. एकदा वंदना श्रीधरला म्हणाली -

'आपण एक-दोन दिवसासाठी जवळच कुठंतरी ट्रीपला जाऊ या का?'

'हे असले लाड आणि वायफळ खर्च मला परवडणार नाहीत. माझ्या आईवडिलांना सुखात

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे.

**- अध्यक्ष**

ठेवण्यासाठी मला पैसा पाहिजे होता. तुझी नोकरी नसती तर मी तुझ्याशी कधीच लग्न केलं नसतं.'– श्रीधर

याआधी कांही दिवसच वंदना–श्रीधर त्याच्या मित्राच्या लग्नासाठी निघाले होते. वाटेत गजरेवाला दिसला. 'आलेच हं' वंदना गजरेवाल्याकडून कागदात गुंडाळून गजरा घेऊन आली. 'अहो फक्त तीन रुपयांना छान गजर मिळाला. लग्नाच्या ठिकाणी गेल्यावर केसात माळेन.' श्रीधर शांतपणे म्हणाले, 'ही असली थेरं आणि चैन पुन्हा करू नको.'

प्रथमेशच्या वेळी वंदनाल सातवा महिना चालू होता. कार्यालयीन तपासणीमुळे सलग दहा–बारा दिवस कामाचा ताण होता. शनिवारी संध्याकाळी घरी आल्यानंतर वंदना आडवी झाली. श्रीधर मित्राकडे समोरच गेला होता. सासूबाई मामंजी प्रवचनाला गेले होते. काही वेळात श्रीधर घरी आला. तुला बरं वाटत नाही का? हे औपचारिक शब्दही न उच्चारता आई–बाबा साडेआठपर्यंत घरी येतील तोवर स्वयंपाक झाला पाहिजे असं म्हणत बाहेरच्या खोलीत पेपर घेऊन श्रीधर वाचत राहिला.

काही क्षणांसाठी भूतकाळात हरवलेली वंदना वर्तमानात आली. श्रीधर अजून बोलत होता. 'वंदनाची कार्यक्षमता आजही तशीच आहे. आमच्या परिवाराचा ती केंद्रबिंदू आहे. घराची संपूर्ण आघाडी आजही वंदना सांभाळत असल्याने प्रत्येकजण निर्धास्तपणे आपलं घराबाहेरील कार्यक्षेत्र आरामात सांभाळू शकतो. मी काहीसा फटकळ आहे. शिवाय पुरुष. त्यामुळे मी कदाचित तिचं मन दुखावेल असं बोललं असण्याची शक्यता नाकारता येत नाही, पण मोठ्या मनाच्या वंदनानं मला कधीही त्याची जाणीव करून दिली नाही.' यानंतरचं श्रीरधरचं बोलणं वंदनापर्यंत पोचत नव्हतं. मनानं आकंठ तृप्त आणि कृतकृत्य झालेली वंदना अधिक जोमानं परिवारातल्या प्रत्येकासाठी आपलं अधिक योगदान देण्यासाठी सज्ज झाली.

सोहळ्यानंतर एक महिना गेला. त्यानंतरच्या रविवारी माई संध्याकाळी त्यांच्या मैत्रिणीकडे जाऊन येणार असल्याबद्दल नेहा, प्रथमेश आणि आप्पांना सांगितले होते. जाताना बाहेरूनच त्यांनी प्रथमेशला सांगितले, दोघेही खोलीबाहेर आले. माई म्हणाल्या, 'चहा–खाणे करून ठेवले आहे. मी संध्याकाळी सातपर्यंत परत येईन. आल्यावर स्वयंपाक करेन. तू दगदग करू नको.'

माई गेटच्या बाहेर पडून काही अंतर गेल्यावर त्यांना वाटलं, लताला विकतचा खाऊ देण्यापेक्षा चार दिवसांपूर्वी केलेला चिवडा–लाडू घेऊन जावे म्हणून त्या परत आल्या. हॉलचं दार ढकलून त्या आत जाणार, तोवर त्यांना नेहा खूप जोरात बोलत असल्याचे जाणवले म्हणून त्या तेथेच थांबल्या. नेहाचे बोलणे ऐकू लागल्या. नेहा म्हणत होती,

'सुटीच्या दिवशी आई–आप्पा दोघंही घरी नाहीत. किती छान वाटतंय ! माईच्या संसार कुशलतेचं कौतुक चार लोकांत आप्पांनी केल्यामुळे त्यांना स्वर्ग दोन बोटं उरला आहे ! आधीच मर्कट अशी माईची अवस्था झाली आहे ! लग्नापासून आजवर हे माझं घर आहे, हा माझा संसार आहे असं मला कधीही वाटलं नाही. आपल्या आवडीचा पदार्थही कधी करून खाता आला नाही. कारण खाणं आणि स्वयंपाकाचे सर्वाधिकार माईंचे. माझे आई–बाबा आल्यावरही काय करायचं हे माईच ठरविणार. हॉलमध्ये अप्पांचा बेड, त्यावर एका बाजूला उशी आणि दुसऱ्या बाजूला पांघरुणाची घडी. हॉलमध्ये बेड मला जराही आवडत नाही, पण करणार काय? माई म्हणतील तेव्हा ट्रिप, त्या म्हणतील तेव्हा बाहेर खायला जायचं. आपल्या लग्नाचा वाढदिवसही त्या ठराविक चाकोरीतूनच. माझ्या सुयशचा अर्धा–अधिक ताबा त्यांनी घेतलाच आहे. हे सारं मला आता अगदी नकोसं झालं आहे. आपल्या दोघांच्या शाखा वेगळ्या असल्या तरी बॉस एकच आहे. त्यामुळे सुयोग्य कारण देऊन बदलीसाठी आपण अर्ज करू, पण या घरातून बाहेर पडू !' हे सारं ऐकून माईंच्या पायाखालची जमीन सरकली, पण यातून मार्ग काढायचाच या निर्धारानं माई मागे वळल्या आणि मैत्रिणीच्या घराच्या वाटेकडं चालू लागल्या...

**– सौ. कमल हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# हिवाळ्यामध्ये तिळाचे महत्त्व

आपल्या मसाल्याच्या पदार्थांमध्ये तिळाला महत्त्वाचे स्थान आहेच. भाजलेले तीळ पदार्थाचा खमंगपणा वाढवतात. दोडक्याची भाजी तिळाची पूड वापरल्याने अधिक चविष्ट लागते. तर गुळाची पोळी तिळामुळे अधिक खमंग होते. तीळ आणि गूळ यांचा एकत्रित उपयोग हिवाळ्यात स्वास्थ रक्षणाच्या दृष्टीने खूप चांगला आहे गुळामुळे शरीराला भरपूर उष्मांक मिळतात. शिवाय रक्त वाढीसाठी उपयुक्त असे लोह सुद्धा मिळते. गुळामुळे शरीराला उष्णता मिळाली तरी स्निग्धत्त्व मात्र त्यात नाही. हिवाळ्यामध्ये शरीरात रुक्षत्त्व वाढू न देण्यासाठी तिळाचे प्रयोजन आहे.

आपल्या ज्ञानी पूर्वजांनी धार्मिक रूढी-परंपरांच्या निमित्ताने धनुर्मास आणि संक्रांत सणाच्या निमित्ताने तिळाचा वारंवार उपयोग करायला लावून हिवाळ्यातील तिळाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

हिवाळ्यात असणाऱ्या पौष वद्य एकादशीला षट्‌तिला एकादशी म्हणतात. म्हणजेच तिळाचा उपयोग सहा प्रकारे करावा, असे आपल्या प्राचीन ऋषीमुनींना सांगायचे आहे. हे सहा प्रकार असे आहेत.

(१) तिलसेवन - म्हणजे तिळाचा आहारामध्ये उपयोग करणे.

(२) तिलोद्वर्तन - तिळाचे उटणे लावून स्नान करणे.

(३) तिलोदक स्नान - तीळ वाटून घेऊन गरम पाण्यात घालून त्या पाण्याने स्नान करणे.

(४) तिळाचे दान करणे.

(५) तिलतर्पण -आपल्या परलोकवासी पूर्वजांना तिळाचे अर्घ्य देऊन तृप्त करणे.

(६) तिल होम-अग्रिहोत्रामध्ये तिळाचा अधिक वापर करणे.

अशा सहा प्रकारे तिळाचा वापर करण्यास सांगितले आहे. परंतु केवळ या षट्‌तिला एकादशीच्याच दिवशी वापर न करता संपूर्ण हिवाळ्यातच जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा अशाप्रकारे तिळाचा वापर अवश्य करावा.

तीळ आपल्या आहारात असतातच. तिळाची पूड, वस्त्रगाळ केलेल्या त्रिफळा चूर्णामध्ये थोडे डाळीचे पीठ मिसळून पाणी घालून साबणाऐवजी जर हे उटणे वापरले तर हिवाळ्यात सुद्धा आपली त्वचा चांगली मऊ आणि निरोगी राहील. तिळाच्या पाण्याने स्नान करून बघायला हरकत नाही.

तिळाचे दान-दान केंव्हाही गरजू व्यक्तीलाच देणे योग्य ठरते. आणि काही अंशी त्याची गरज भागेल, अशा प्रमाणात देणे हेही महत्त्वाचे आहे. शेवटची दोन म्हणजे तिलतर्पण आणि तिलहोम! या दोन शब्दातच अर्थ सूचित होत आहे.

पूर्वी आपल्याकडे काही कुटुंबांमध्ये अखंड अग्निहोत्र होत असे. तर अजूनही काही घरांमध्ये सकाळ-संध्याकाळ केवळ सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळेला, हे अग्निहोत्र केले जाते. आपली ही प्राचीन अग्निहोत्राची पद्धत, हल्ली रोग निवारणार्थ सर्व जगात मान्यता पावली आहे. यामध्ये गायीच्या शेण्या म्हणजेच गोवऱ्या, कापूर आणि तूप वापरून अग्नी प्रज्वलित केला जातो. अग्नी प्रज्वलित झाल्यावर त्यात गाईचे तूप, तीळ आणि तांदूळ यांची आहुती दिली जाते.यातून निर्माण होणाऱ्या धुराचा वास ज्यांनी अनुभवला आहे त्यांना मनाची प्रसन्नता नक्कीच जाणवली असेल. असो, आपल्या आवडी आणि सवडीनुसार जमेल तेवढ्या प्रकारे हिवाळ्यामध्ये तिळाचे अवश्य सेवन करता येईल.

**- डॉ सुस्मिता गाडगीळ**

मोबा. ९४२१२९०४७७

# हिन्दू शब्दाची व्युत्पत्ती

आपण हिन्दू आहोत हे खरे आहे, परंतु हिंदू म्हणजे काय हो??? सांगाल का??? तर मंडळी वाचा आणि एखाद्याने विचारले की हिंदू म्हणणे काय, तर चट्दिशी सांगता आले पाहिजे...!!!

हिंदू शब्द 'सिंधु' शब्दाचा अरबी अपभ्रंश आहे, असे आपल्याला आतापर्यंत सांगितले गेले आहे, पण, खालील लेखामध्ये ते कसे असत्य आणि दिशाभूल करणारे आहे, हे सप्रमाण सिद्ध करून दाखवले आहे.

**हिंदू हा शब्द हीनं दुष्यति इति ।**

हिन्दुः म्हणजे – 'जो अज्ञान आणि हीनतेचा त्याग करतो' त्याला हिन्दू म्हणतात. 'हिन्दू' हा शब्द अनंत वर्षांपासून असलेला प्राचीन मूळ संस्कृत शब्द आहे.

या संस्कृत शब्दाचा सन्धीविग्रह केल्यास तो हीन+दू=हीन भावना+पासून दूर असलेला,मुक्त असलेला तो हिन्दू होय आणि आपल्याला हे वारंवार खोटे सांगून फसविले जात होते की, 'सिन्धूचे अपभ्रंशित रूप म्हणजे हिन्दू' हा शब्द आपल्याला मोगलांनी दिला. खरे म्हणजे 'हिन्दू' या शब्दाची उत्पत्ती 'वेदकाळापासून आणि वेदातूनच झालेली आहे, म्हणून, हिन्दू हा शब्द कुठून आला आणि त्याची उत्पत्ती कशी झाली, हे अवश्य जाणून घेऊयात. आपल्या 'वेद' आणि 'पुराणात' ही 'हिन्दू' या शब्दाचा उल्लेख सापडतो.

आज आपण 'हिन्दू' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली ते पाहूयात. 'बृहस्पति अग्यम'(ऋग्वेद) मध्ये हिन्दू शब्दाचा उल्लेख असा आलेला आहे. 'हिमलयं समारभ्य यावत इन्दुसरोवरं। तं देवनिर्मितं देशं हिन्दुस्थानं प्रचक्षते।' म्हणजेच, 'हिमालयापासून इन्दू सरोवरा (हिन्दी महासागर) पर्यंत ईश्वर निर्मित राष्ट्र म्हणजे हिन्दुस्थान ('हिन्दू'चे स्थान) होय.

केवळ 'वेदांत'च नव्हे, पण 'शैव' ग्रंथातही 'हिन्दू' शब्दाचा उल्लेख असा आलेला आढळतो, हीनं च दूष्यते एव्, हिन्दुरित्युच्चते प्रिये।

म्हणजेच – जो अज्ञान आणि हीनत्व यांचा त्याग करतो तो हिन्दू होय.

कमीअधिक प्रमाणात असाच श्लोक 'कल्पद्रुमा'तही आढळतो– हीनं दुष्यति इति हिन्दुः। म्हणजे– जो अज्ञान आणि हीनत्व यांचा त्याग करतो त्याला हिन्दू म्हटले जाते.

पारिजात हरण या संस्कृत नाटकात हिन्दूंचा असा उल्लेख आलेला आढळतो–

**हिनस्ति तपसा पापां, दैहिकां दुष्ट**
**हेतिभिः शत्रु वर्गंच, स हिन्दुरभिधीयते।।**

म्हणजे, जो आपल्या तप:सामर्थ्याने शत्रू, दुष्ट आणि पापाचा नाश करतो. तो हिन्दू होय.

माधव दिग्विजयमध्ये हिन्दू या शब्दाचा असा उल्लेख केला गेलाय –

**ओंकारमन्त्रमूलाढ्य,पुनर्जन् गौभक्तो भारतः**
**गरुर्हिन्दुर्हिंसन दूषकः।।**

म्हणजे – जो ॐकाराला ईश्वर रचित रचना मानतो, ज्याची पुनर्जन्म आणि कर्मसिद्धान्त यावर श्रद्धा आहे,जो गौ पालन करतो आणि वाईटाला दूर ठेवतो, तो हिन्दू आहे.

केवळ एव्हढेच नव्हे तर, आपल्या ऋग्वेदात (८:२:४१) विवहिन्दू नावाच्या अति पराक्रमी आणि दानी राजाचे वर्णन आलेले आहे. ज्याने ४६००० गाईंचे दान केल्याचा उल्लेख आहे आणि 'ऋग्वेद मंडला'तही त्याचा उल्लेख येतो.

'हिनस्तु दुरिताम्।' वाईटाला दूर सारण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारे आणि सनातन धर्माचे पालन पोषण करणारे हिन्दूच आहेत.'

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

या लेखांकाचे शीर्षक वाचून तुम्हाला जरा आश्चर्यच वाटलं असेल. कारण सर्वसाधारणपणे माणूस बँकेत नोकरी करतो, किंवा बँकेत पैसे ठेवतो किंवा बँकेतून पैसे काढतो. पण मुशाफिरी? असे नाव देण्याची दोन कारणे आहेत. एक – मी बँकेतल्या नोकरीच्या निमित्ताने बऱ्याच ठिकाणी हिंडलो, म्हणजे माझ्या बदल्या झाल्या. दोन – मी जास्त करून संवेदनाक्षम खात्यांत काम केले. त्यामुळे मला आलेले विविध अनुभव कधी चित्र–विचित्र, कधी धोकादायक तर कधी सौहार्दपूर्णही !

अशाच प्रकारचे अनुभव आपल्याला प्रवास करताना देखील येतात, म्हणून ही माझी बँकेतील मुशाफिरी ! हे सर्व अनुभव संगतवार नाहीत. तसेच खरी नावे– गावे आणि जागा उल्लेखलेल्या नाहीत.

सर्वसाधारणपणे लोकांना वाटते की बँकेत काम म्हणजे गरगरणाऱ्या पंख्याखाली किंवा आता तर ए.सी. मध्ये काम करणे, पैसे देणे घेणे आणि अडीच तीन वाजता बँक बंद झाली की फ्री ! परंतु असे नसते. एकतर सर्वसाधारण खात्यांमध्ये सुद्धा लोक दिवसा झालेल्या पैशाच्या व्यवहाराचा ताळेबंद जुळवल्या शिवाय घरी जाऊ शकत नाहीत, त्या ताळेबंदासाठी कधीकधी रात्रीपर्यंतही वेळ लागू शकतो.

हे झाले सर्वसाधारण खात्यांचे काम, परंतु याशिवाय अशी काही संवेदनाशील खाती असतात, ज्याठिकाणी कामाच्या वेळा कितीही तासाच्या असू शकतात. शिवाय काही अनुभव इतके विचित्र येतात की ते आज निवृत्ती नंतरसुद्धा विसरू शकत नाहीत.

असाच एक अनुभव मी या पहिल्या लेखात मासला म्हणून देत आहे. एका शाखेमध्ये बहुसंख्य ग्राहक अल्पसंख्य समाजाचे होते. तसेच तस्करी / गुंडगिरी यांच्याशी संबंधित ! त्यामुळे त्यांच्याशी व्यवहार करताना फार जपून करावा लागे.

विशेषत: जर कर्ज वसुली करावयाची असेल तर ! एकीकडे पैसे वसुली करण्याची निकड, त्याकरिता हेड ऑफिसने लावलेला तगादा ! दुसरीकडे पैसे वसुली करणे कर्मकठीण !

कडक भाषा तर वापरून चालायचीच नाही. उलट त्याने पैसे दिले तर बँकेवर मेहेरबानी केली असे दाखवणे. जवळजवळ स्वाभिमान गुंडाळून ठेवावा लागे. शिवाय आपण सकाळी गेलो असताना संध्याकाळी बोलावले तर संध्याकाळी जायचे आणि संध्याकाळी गेलो असता दुसऱ्या दिवशी सकाळी बोलावले तर दुसऱ्या दिवशी सकाळी जायचे, जरासुद्धा नाराजी न दाखवता. असो.

अशा प्रकारे प्रयत्न करून मी कंटाळून गेलो. पण एका प्रकरणात पैसे तर वसूल होतच नव्हते. हेड ऑफिसचा तगादा चालूच होता. मग एक कल्पना सुचली. तो कर्जदार ज्या समाजाचा होता त्या समाजाचा एक माणूस आमचा कर्मचारी होता. त्याला अर्थात त्याची भाषा पण बोलता येत असे. त्या स्टाफला बरोबर घेऊन मी वसुली करता जायला सुरुवात केली. तो कर्जदार नरमला, त्याने थोडे थोडे पैसे पण द्यायला सुरुवात केली.

त्यानंतर जरी मी एकटा गेलो तरी त्याची वागणूक नम्रतेची असे. असाच एकदा मी दुपारी त्याच्याकडे चाललो होतो. सुट्टीचा दिवस नसूनही त्या नेहेमीच्या गजबजलेल्या रस्त्यावर, स्मशान शांतता होती. मी आपल्याच नादात, बँकेच्या कामाचा विचार करीत चाललो होतो. मला बघून ग्राहकाने कपाळावर हात मारला. मला काही कळे ना! त्याच्या नोकराने सांगितले, साब, आप क्यूँ आये? अभी तो हमने एक आदमी को टपकाया है। अभी गँगवॉर शुरू होगा । आपने रास्तेपर सन्नाटा था

वो देखा नही क्या ? हे ऐकून माझी पाचावर धारण बसली.

पण कस्टमरने बरोबर एक माणूस दिला आणि एका छुप्या रस्त्याने, गटारांमधून त्याच्या दुकानातून मला बँकेत पोहोचवले. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात, एका टोळीयुद्धाची, १५ माणसे ठार झाल्याची बातमी छापून आली होती. असे कधी कधी आपला काहीच दोष नसताना जीवावर बेतते पण देव कृपेने आपण बचावतो.

या एका अनुभवाच्या अनुषंगाने वाचकांना कल्पना येईल की मला काय सांगायचे आहे !

**केल्याने देशाटन ।**
**पंडित मैत्री सभेत संचार ।**
**करता बँकेतील जॉब ।**
**मनुजा चातुर्य येतसे फार ।**

प्रत्येक लेखांकात असाच विलक्षण, अविश्वसनीय आणि रोमांचकारी अनुभव वाचकांना वाचायला मिळेल एवढी मी खात्री देईन.

**– श्रीकांत शिंत्रे**
शब्दांकन : **सौ. ज्योत्स्ना शिंत्रे**
मोबा. ९९२००५८७०५

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**
**श्री. रोहित गवळी – 9657963475**

म्हैसूर विद्यापीठातील 'डिपार्टमेंट ऑफ अर्थ सायन्स'चे प्रा. डॉ. श्रीकांतप्पा यांनी दिलेल्या माहितीनुसार ज्या पाषाणातून रामलल्लाची मूर्ती साकारलेली आहे, त्या पाषाणाचं वय ३ बिलियन वर्षे म्हणजे ३० हजार लाख वर्षे एवढे आहे. म्हैसूरच्या दक्षिण पश्चिमेला असलेल्या सरगुर गावानजिकचे हे पाषाण आहेत. या पाषाणासंदर्भात म्हैसूर विद्यापीठाने ३० वर्षाहून अधिक काळ संशोधक केले असून दक्षिण भारतातील हा सर्वात प्राचीन दगड आहे. श्रीराम मूर्ती हे सनातन धर्माचं प्रतिक आहे. सनातन म्हणजे शाश्वत ! या सनातन प्रतिकाला अतिशय सुयोग्य असा पाषाण शोधून काढल्याबद्दल म्हैसूर विद्यापीठातील संशोधकांचे मनापासून अभिनंदन ! हे शिल्प पाहून गदिमांचे शब्द आठवले.

**कौसेल्याराणी हळू उघडी लोचणे ।**
**दीपून जाय माय स्वत: पुत्र दर्शने ।**
**ओघळले आसू सुखे कंठ दाटला ।।**

शिल्पकार अरुण योगीराज यांचं अभिनंदन !

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 09021011001618l)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक एकोणतिसावा)

सोपानाच्या बोलण्यानं काहीशा आश्वस्त झालेल्या माईंनी पदरानं डोळे पुसले, चेहरा पुसला आणि हळुवारपणे म्हणाल्या, ''बाळा, हे तुझं सांगणं त्या आंबलेल्या भाताबद्दल झालं. आता मी हा ताजा भात आणला आहे, तो तुम्ही स्वीकारलात तर माझ्या मनाला समाधान वाटेल. मी... मी समजेन, की माझ्या अपराधांचं परिमार्जन झालं ! कृपा करा आणि हा मी आता आणलेला ताजा गरम भात खाऊन घ्या !'' माईंच्या या बोलण्यावर सगळी स्तब्ध झाली. ही शांतता छेदली मुक्ताने, म्हणाली, ''माई, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे; पण क्षमा करा माई; पण... पण आमचं तर भोजन झालेलं आहे आणि आता हा भात खाल्ला, तर सहावी माधुकरी घेतल्यासारखं होईल. होय ना रे दादा?'' मुक्तीचं बोलणं ऐकून माईंना पन्हा हुंदका फुटला. पदराचा बोळा तोंडात कोंबून त्यांनी तो आवरण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना त्यात अपयश आलं आणि त्यांचं अवघं शरीर थरथरवून तो हुंदका बाहेर पडलाच. मग मात्र कावेरीअक्कांना राहवलं नाही. गहिवरल्या आवाजात त्यांनी विचारलं, ''ज्ञानेशा, माणसांपेक्षा तत्त्व मोठी असतात का रे? आणि मातृत्वापेक्षा संकल्प आणि नियम मोठे असतात का रे? ही तत्त्वं जेव्हा माणसांपेक्षा मोठी होतात, तेव्हा... !''

''नाही कावेरीअक्का, कृपा करून पुढे बोलू नका ! माणसांपेक्षा तत्त्वं मोठी होतात, तेव्हा काय होतं, ते आम्ही सगळं जाणून आहोत आणि मातृत्वापेक्षा नियम मोठे झाले, की काय होतं, त्याचे परिणाम आम्ही भोगतो आहोत. अक्का, आम्हाला क्षमा करा ! माईंचं वात्सल्य, त्यांची ममता जाणूनही आम्ही आमच्या विचारांमुळे, तत्त्वांमुळे, अतार्किक वागलो ! नाही अक्का, या जगात मातृत्वाला कसलंच आव्हान नाही आणि कोणतेच यमनियम लागू नाहीत! मुक्ते, पर्णावली मांड ! आपण माईंनी आणलेला भात ग्रहण करणार आहोत आणि माई स्वत: आपल्या हाताने तो वाढणार आहेत !'' निवृत्ती निग्रहानं बोलत होता. त्याच्या आवाजात ठामपणा होता; पण स्वर मात्र घायाळ होता. कपाळावरची तरतरलेली शीर निश्चय दर्शवत होती; पण डोळे व्याकूळ होते. बोलण्यात कठोर भाव होता; पण गालावरून अश्रू ओघळत होते. त्याच्या बोलण्यानं त्या इवल्या झोपडीत निर्माण झालेला त्या चिमुकल्यांच्या मनावरचा ताण एकदम निवळला. वातावरणात ताजेपणा आला. भर माध्यान्हीला स्नेहाची, मायेची, ओलाव्याची झुळूक आली. कावेरीअक्का आनंदल्या, तर माईंच्या चेहऱ्यावर ऊन-पावसाचा खेळ रंगला. चेहऱ्यावर हसू उमटलं. ओठांवरून ओघळलं आणि त्याच्या जोडीला ओघळले, डोळ्यांतून आनंदाश्रू आणि मग झोपडीत जणू भर माध्यान्हीला अन्नपूर्णा अवतरली ! पर्णावली घेऊन चारही भावंडं बसली आणि पदर खोचून, भरल्या डोळ्यांनी, समाधानी मनानं आणि गहिवरल्या भावनेनं द्वारकामाई या चौघांना आपण आणलेला ताजा भात वाढू लागल्या. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होताच; पण सोपानाच्या चेहऱ्यावर तर विशेष आनंद होता. त्या इवल्याशा झोपडीत समाधानाचा प्रकाश पसरला होता; पण ते दृश्यच इतकं विलोभनीय होतं की, सूर्यालाही तिथं डोकावण्याचा मोह आवरला नाही ! छताला असलेल्या झरोक्यातून कवडशांच्या रूपात तो तिथं अवतरलाच आणि ते दृश्य डोळे भरून पाहू लागला !

माईंनी त्या ऊनऊनीत भातावर तूप घालून आणलं होतं आणि त्या गरम तूप-भाताचा वास सगळ्या झोपडीभर दरवळत होता. वाऱ्यालाही मोह

आवरला नाही. ग्रीष्माच्या ऋतूवर अतिक्रमण करत तोही त्या झोपडीत घुसला आणि तो दरवळणारा तूप-भाताचा गंध आपल्या श्वासात भरून घेऊन तो उधळण्यासाठी वेगाने वाहत तो झोपडीच्या बाहेर पडला. कावेरीअक्का भरल्या डोळ्यांनी हे सारं पाहत होत्या. माई भरल्या डोळ्यांनी या मुलांना वाढत होत्या आणि ही चौघं भरल्या डोळ्यांनी त्या गरम भाताचे घास खात होती. प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी होतं; पण त्या पाठीमागचं प्रत्येकाचं कारण वेगळं होतं. 'मुलांनी आपलं ऐकलं' म्हणून कावेरीअक्का गहिवरल्या होत्या. 'आपल्या हातून नकळत का होईना घडलेल्या पापाचं परिमार्जन झालं' म्हणून द्वारकामाईंना गहिवरून आलं होतं. 'आपण योग्य मार्ग काढला आणि माईंच्या मातृत्वाच्या भावनेला न्याय दिला' म्हणून निवृत्ती गहिवरला होता. 'मातृत्वाला तत्त्वाचं आव्हान देत राहिलो असतो, तर मातृत्वाचा अपमान झाला असता,' या विचारानं ज्ञानेश्वर गहिवरला होता, तर 'आपल्यामुळे हा सगळा प्रसंग घडला. यात काही विपरित झालं असतं, तर तो माईंच्या मायेच्या भावनेला तडा गेला असता. तसं झालं नाही,' या विचारानं गहिवरून सोपानाचे डोळे भरून आले, तर मुक्ता? त्या गरम तूप-भाताच्या प्रत्येक घासागणिक मुक्तीला आई आठवत होती, असाच ऊनऊनी तूप-भात करून मायेनं भरवणारी, आणि गहिवरून तिचेही डोळे भरून वाहू लागले होते. डोळ्यांत अश्रू भरण्याची क्रिया एकच होती; पण त्या अश्रूंपाठीमागची प्रत्येकाची भावना वेगळी होती, कारण वेगळं होतं, मानसिकता वेगळी होती. ईश्वराच्या अद्‌भुत मायेचाच हा साक्षात्कार होता. काहीही असो, त्या प्रसंगानं त्या झोपडीत आनंद पसरला होता. समाधान पसरलं होतं आणि गरम तूप-भाताच्या गंधातून ते, झोपडीभर अगदी झोपडीच्या कानाकोपऱ्यांतून दरवळत होतं !


(क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**
**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**
**गुरुवार, दि. 22 : गुरुपुष्यामृत**
**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231–2546585**

**दिनविशेष (फेब्रुवारी २०२४)**
**पौष - माघ १९४५**
**शोभननाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**गुरुवार दि. १ :** राष्ट्रीय तटरक्षक दिन, **रविवार दि. ४ :** म. जागतिक कर्करोग दिन, **शुक्रवार दि. ९ :** दर्श मौनी अमावास्या, **रविवार दि. ११ :** श्री धर्मनाथ बीज, **मंगळवार दि. १३ :** श्री गणेश जयंती, **बुधवार दि. १४ :** श्री वसंत पंचमी, **शुक्रवार दि. १६ :** रथसप्तमी, जागतिक सूर्यनमस्कार दिन, **सोमवार दि. १९ :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती, **बुधवार दि. २१ :** गोंदवलेकर महाराज जयंती, **गुरुवार दि. २२ :** विश्वकर्मा जयंती, गुरुपुष्यामृत, **शुक्रवार दि. २३ :** संत गाडगेबाबा जयंती, **सोमवार दि. २६ :** स्वा. सावरकर पुण्यतिथी, **मंगळवार दि. २७ :** मराठी भाषा गौरव दिन, **शुक्रवार दि. २८ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४२), राष्ट्रीय विज्ञान दिन, **गुरुवार दि. २९ :** श्रीकृष्ण सरस्वती जयंती.

# मुस्लिम स्त्री कलाकार

## मुबारक बेगम

मुस्लिम स्त्री कलाकार या लेखमालेत आज मी मुबारक बेगम यांच्याबद्दल माहिती सांगणार आहे. मुबारक बेगम हे नाव बऱ्याच जणांना माहित सुद्धा नसेल.

मुबारक बेगम ही हिंदी चित्रपटसृष्टीमधील एक चांगली गायिका होती. तिचा जन्म १९३६ साली राजस्थानमध्ये चुरू या जिल्ह्यात झाला. १९४९ साली तिला पार्श्वगायनाची पहिली संधी मिळाली. त्या सिनेमाचे नाव होते 'आइये'. 'आईये' या सिनेमाचे संगीत नाशाद (नौशाद नव्हे) यांनी दिले होते आणि नाशाद यांनीच मुबारक बेगम यांना ती संधी मिळवून दिली. या सिनेमातील 'मोहे आने लगी अंगडाई, आजा आजा' हे सुंदर गाणे त्यावेळी गाजले होते. याच सिनेमात तिने लता मंगेशकर यांच्या-बरोबरही एक द्वंद्वगीत गायले आहे.

'ऑल इंडिया रेडिओ' वर सुगम संगीत गायनापासून मुबारक बेगम यांचा गायनप्रवास सुरू झाला.

मुबारक बेगम यांनी एकंदर ११५ चित्रपटात १७८ गाणी म्हटली आहेत. ती प्रसिद्ध गायिका होती. परंतु तिला पैशापेक्षा संगीताची जास्त आवड होती. त्यामुळे ती जो खर्च करत होती व जे मिळवत होती त्याचे मेळ होत नसे. त्यामुळेच ती पैसे साठवू शकली नाही. २०१५ साली तिची मुलगी वारली. त्यानंतर मुबारक बेगम खूप आजारी पडली. तेव्हा तिच्याकडे हॉस्पिटलचे बील देण्यासाठी सुद्धा पैसे नव्हते. सलमान खानने तिला त्यावेळी खूप मदत केली.

मुबारक बेगम यांची गाजलेली काही गाणी खालीलप्रमाणे आहेत.

(१) 'मुझको अपने गले लगालो ऐ मेरे हमराही' या गाण्याचे गीतकार हसरत जयपुरी व संगीतकार शंकर जयकिशन होते.

(२) 'कभी तनहाइयों में यू, हमारी याद आयेगी' हे गाणे 'हमारी याद आयेगी' या सिनेमातील आहे व त्याचे संगीतकार आहेत स्नेहल भाटकर. हे गाणं मुबारक बेगम यांनी आर्त स्वरात अत्यंत सुंदर म्हटले आहे. स्नेहल भाटकर यांनी 'भीमपलास' या रागात हे गाणे बसवले आहे.

(३) 'ये, मुह और मसूरकी दाल' हे 'अराऊंड द वर्ल्ड' या सिनेमातील गाणे त्यांनी शारदा यांच्या बरोबर म्हटले आहे.

(४) 'वो ना आयेंगे पलटकर' हे गाणे १९५५ साली आलेल्या 'देवदास' या चित्रपटातील त्यांनीच म्हटले आहे.

(५) 'जब इश्क कही हो जाता है' हे १९६५ साली आलेल्या 'आरजू' या चित्रपटातील गाणे मुबारक बेगम व आशा भोसले यांनी म्हटले आहे. या सिनेमाचे संगीतकार आहेत शंकर-जयकिशन.

मुबारक बेगम यांचा गझल गायनात हातखंडा होता.

अशी ही गायिका २०१६ साली मुंबईला जोगेश्वरी येथे अनंतात विलीन झाली. आज किती जणांना मुबारक बेगम या नावाची गायिका होती हे माहीत असेल ते सांगता येत नाही.

**- प्रकाश गानू,**

मोबा. ९४२१९२९८४७

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ४ : कर्म ब्रह्मार्पण योग**

**श्रीभगवानुवाच ।**
**सर्व इंद्रियां कर्म प्रमाण । दुसरें प्राण कर्म असे जाण ।**
**आत्म संयमाग्नीचे ठायीं करिती हवन ।**
**दिप्ती ज्ञाने करूनी ।।**
प्राणेंद्रिय–क्रिया कोणी सर्व होमूनि टाकिती ।
चिंतनाने समाधीस अंतरीं चेतवूनियां ।।२७।।

**तेथें होमिताती एक द्रव्य वेंजिती ।**
**एक त्रिविध तपें करिती ।**
**एक योगातें अनुष्ठिती ।**
**एक स्वधा यज्ञ दान करूनिया ।।**
द्रव्यें जपें तपें योगें चिंतनें वा अशापरी ।
संयमी यजिती यज्ञ व्रतें प्रखर राखुनी ।।२८।।

**आपण होमिती प्राणी । परब्रह्मी प्राण पान हे दोन्ही ।**
**बैसती प्राणअपानाते धरूनी । ते प्राणायाम परायण ।।**
होमिती एकमेकांत कोणी प्राण–अपान ते ।
रोधूनि गति दोहोंची प्राणायामास साधिती ।।२९।।

**अल्प नेमिलेनी आहारें । प्राणायाम नेमिती निर्धारे ।**
**तयासी सर्व यज्ञ फळ पुरे । येणे किल्मिषें नाशती ।।**
प्राणांत होमिती प्राण कोणी आहार तोडुनी ।
यज्ञ–वेत्ते चि हे सारे यज्ञानें दोष जाळिती ।।३०।।

**यज्ञ करूनी शेष भक्षिती ।**
**ते परिपूर्ण अमृतपाने ब्रह्म पावती ।**
**यज्ञ यजन न करिती ।**
**तया इहलोक ना परलोक ।।**
यज्ञ–शेषामृतें धाले पावले ब्रह्म शाश्वत ।
न यज्ञाविण हा लोक कोठूनि पर–लोक तो ।।३१।।

**ऐसे हे बहु यज्ञ विशेखी । असती वेदी आणि ब्राह्मणाचे मुखी । तया अवधिया कर्मविधी देखी । जाणितल्या मोक्ष होय ।।**
विशेष बोलिले वेदें असे यज्ञ अनेक हे ।
कर्मीनें घडिले जाण जाणूनि सुटशील तूं ।।३२।।

**जे म्यां बोलिले द्रव्ययज्ञ आदि करूनी । ब्रह्मार्पण यज्ञ हुतासुनी । सर्व कर्मफळ अविनाश जाणोनी । ज्ञानरूपी समाविली ।।**
द्रव्य–यज्ञादिकांहूनि ज्ञान–यज्ञ चि थोर तो ।
पावती सगळीं कर्मे अंतीं ज्ञानांत पूर्णता ।।३३।।

**ते गुरुसी नमस्कार करूनी । सेवा करूनी पुसोनी ।**
**उपदेश मान विचारूनी । ज्ञानतत्त्व देखिजे ।।**
सेवा करूनि तें जाण नम्र–भावें पुसूनियां ।
ज्ञानोपदेश देतील ज्ञानी अनुभवी तुज ।।३४।।

**अर्जुना न पावसी मोहातें तत्त्वता । हे जाणितलीया मागुता । सर्वांभूती आत्मा विशेषता । देखशील तूं ।।**
ज्या ज्ञानानें असा मोह न पुन्हां पावशील तूं ।
आत्म्यांत आणि माझ्यांत भूतें नि:शेष देखुनी ।।३५।।

# राममंदिर - एक रक्तरंजीत इतिहास



राम मंदिर विषय तसा खूप मोठा नाहीच. कारण या हिन्दुस्थानात अनेक ठिकाणी राम मंदिरे असतील. प्राचीन असतील, नवीनही असतील. पण श्रीक्षेत्र अयोध्या येथील राम मंदिर म्हटले की जणू काळीज चरचर कापल्याची जाणीव होते. मग नक्की हा केवळ आस्थेचाच विषय आहे का? तर मुळीच नाही. कारण विषय जर फक्त आस्थेचा असेल तर या राष्ट्रातील कोणत्याही भूमीवर शेकडो एकरात भव्य मंदिर केव्हाच बांधले गेले असते. केली असती तेथे पूजा अर्चा... मग अयोध्याच का?

आयोध्यामधे प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला. किंबहुना त्यांच्या पुढील पिढ्याही येथे वाढल्या. अशा या पवित्र भूमीत त्यांचे भव्य मंदिर असावे. कदाचित ही समस्त हिन्दूजनांची आस्था होऊ शकते. पण हा विषय खरोखर केवळ आस्थेपुरता मर्यादित आहे का? आणि तो ठेवला का? तर मी म्हणेल, नाही ! हा विषय केवळ आस्थेपुरता मर्यादित होऊच शकत नाही. भगवान सर्वत्र आहेत ही हिन्दूंची धारणा आहे. पण अयोध्यासाठीच अट्टहास का? कशासाठी? आज यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणार आहे.

आज हिन्दू राममंदिराचा विचार करत असेल तर तो बाबरी ढाचाचे पतन अर्थात १९९२ पासून. पण हा संघर्ष केवळ १९९२ पासूनचाच होता का? तर नाही. शेकडो वर्षांचा हा लढा, लाखों राम भक्तांचे बलिदान, त्यातून साकार होत असलेले हे शिल्प किती रक्तरंजित खुणांवर पाऊल ठेवत आले आहे याचा केलेला हा लेखाजोखा. हा लेख त्या हिन्दूंकडे अधिक निर्देश करील ज्यांना इतिहासाचे स्मरण नसेल. मग हे राम मंदिर कशासाठी? असाही प्रश्न पडत असेल. आत्मविस्मृत झालेल्या हिंदूंची केवळ आस्थाच नव्हे, तर स्वाभिमानही जागा व्हावा आणि अजूनही काही आव्हाने पूर्णत्वास नेण्यास हा निद्रिस्त समाज उत्थान करून सज्ज व्हावा याचसाठी पुन्हा पेटवलेले हे यज्ञकुंड! या यज्ञकुंडात आजवर किती समिधा वाहिल्या गेल्या त्याची ही यशोगाथा...

धार्मिक मान्यतेनुसार हिन्दूंचे आराध्यदैवत प्रभू रामचंद्र यांचे पुत्र कुश यांनी शरयू नदीच्या तटावर भव्य अशा राममदिरांचे निर्माण केले. अनेक वर्षे नव्हे, तर अनेक शतके हिन्दूंचे ते श्रद्धास्थान ठरले.

**अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।**

**पुरी द्वारकावती चैव सप्तैता मोक्षदायिका ।।**

अशा प्रकारे हिंदूंच्या सात आस्थाकेंद्रातील प्रथम श्रद्धास्थान ती हिच आयोध्या नगरी.

आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर ध्वस्त करण्यासाठी बाबर हा एकमेव इस्लामी आक्रांता आला असे नव्हे तर त्या अगोदरही या मंदिरावर अनेक कट्टर इस्लामवाद्यांची वक्रदृष्टी होती. त्यात प्रथम प्रयत्न केला तो १४४० साली महमूदशाहने परंतु त्याला त्यात काही यश मिळाले नाही. राजा सुहेलदेवने वाटेतच त्याचा खात्मा केला आणि मंदिर रक्षणाची जबाबदारी पार पाडली. त्यानंतर राम जन्मभूमी रक्षणासाठी कालानुक्रमे सुमारे ७६ वेळा महायुद्धे झाली. लाखो लोकांनी, संत महंत आणि शेकडो सम्राटानी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. आज हाच ज्वलंत इतिहास मांडण्याचा केलेला प्रयत्न.

कालखंड होता १५२६ चा. इस्लामी रियासत स्थापन करण्याची मंशा घेऊन उज्बेगिस्तानमधून सुमारे पाच-साडे पाच लाख सैन्य घेऊन जहरुद्दीन मुहम्मद बाबर हिंदुस्थानच्या भूमीवर उतरला. बाबर म्हणजे इस्लामवादाचा कट्टर पुरस्कर्ता. वाटेत अनन्य अत्याचार करत तो मेवाडला येऊन पोहोचला. मेवाडचे साम्राज्य म्हणजे हिंदुस्थानचे जणु सरताज. धर्माच्या बाबतीत तितकेच कट्टर... तत्कालीन काळात मेवाडचे महाराजा होते राणा संग्रामसिंह अर्थात राणा सांग. बाबरचा पहिला यशस्वी मुकाबला केला तर तो याच राणा सांगने. तब्बल तीन वेळा राणा सांगकडून बाबरला धुळ खावी लागली. अपमानित होऊन बाबर अवधपुर म्हणजे अयोध्याच्या दिशेने पळत सुटला. मनात सुडाची भावना होतीच. ती शमवणे त्याला गरजेचे वाटू लागले होते.

बाबरच्या सैन्याचे मनोधैर्य खचले होते. एखादा विजय हवा म्हणून त्याने याच प्रभू श्रीरामाच्या अयोध्यावर आक्रमण केले. बाबर अयोध्यावर चाल करून तेथील तत्कालीन व्यवस्था नष्ट करून अयोध्येच्या गादिवर बसला. सूडाची आग मात्र धगधगत होती. याच काळात अयोध्या भूमी श्यामानंद महाराज यांच्या अधीन होती. श्यामनंद महाराज म्हणजे प्रख्यात आध्यात्मिक वारसा असलेले महागुरु. त्यांची ख्याती ऐकून इस्लामी फकीर ख्वाजा कजल अब्बास मूसा हा त्यांचा शिष्य बनला. कालांतराने त्याचीही कीर्ति होऊ लागली. काही वर्षात जलालशाह नावाचा कट्टर इस्लामवादीही श्यामानंद महाराजांचे शिष्य बनले. हे दोघे जरी वरवर शिष्य असले तरी येथील राम मंदिर मात्र नेहमी त्यांच्या डोळ्यात सलत होते.

काही दिवस असेच गेले. या दोघांनी संगनमत करून मक्काप्रमाणे इथे भव्य इस्लामी केंद्रबिंदू व्हावे असा चंग बांधला. त्यातील योजनांचा काही भाग म्हणून राम मंदिराच्या आजूबाजूच्या जमिनीत त्यांनी मृत मुसलमान लोकांचे दफन करण्यास सुरुवात केली. अल्पावधीत या भूमीचे एका कब्रस्तानमधे रूपांतर झाले. प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही, तर दोघांनी मिळून बाबरची भेट घेतली आणि येथील मंदिर पाडून मस्जिद उभारण्याची इच्छा व्यक्त केली.

बाबर आधीच सूड भावनेने पेटला होताच. त्यात अजून भर पडली. हा बदला घेण्यासाठी आणि हिंदूंची आस्था नेस्तनाबूत करण्यासाठी त्याने आपला मोर्चा राम मंदिराकडे वळवला. आपल्या शिष्यांचे हे कारस्थान पाहून श्यामनंद महाराज व्यथित झाले. मूर्तीचे पावित्र्य राखले गेले पाहिजे असा विचार करून मध्यरात्रीच त्यांनी या काळ्या पाषाणातील सुबक मूर्ती शरयू नदीत विसर्जित केल्या आणि ते अज्ञातवासात निघून गेले. मंदिराच्या रक्षणासाठी पाच सहा शिष्य द्वारावर ठेवले. जलालखानने या सर्व पुजाऱ्यांची हत्या केली आणि राम मंदिर उध्वस्त करण्याचा मार्ग मोकळा केला. हे ठरले राम मंदिर रक्षणाचे पहिले बळी.

बाबरची वक्रदृष्टी आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरावर पडली आहे याची पहिली भनक लागली ती भीटीचे राजे राजा महतबसिंह बद्रीनारायण यांना. मंदिराच्या रक्षणासाठी ते स्वतः सुमारे १ लाख ७४ हजार सैन्य घेऊन आयोध्येस पोहोचले. बाबरच्या ४ लाख ५० हजार सैन्यावर हे तूटून पडले. पण दुर्दैवाने बाबरच्या बलाढ्य सैन्यापुढे महतबसिंहच्या सैन्याचा पाडाव झाला. तब्बल ७० दिवस चाललेल्या या युद्धात त्यांच्यासकट सर्व सैन्य कापले गेले. राम मंदिर

रक्षणासाठी ठरलेले हे दुसरे बलिदान होय.

बाबर किती क्रूरकर्मा होता? तर पुढील घटनेवरुन लक्षात येईल. बाबरच्या अंगात जणू सैतानच घुसला होता. २१ मार्च १५२८ रोजी या बाबरने मीर बांकी या आपल्या सेनापतीच्या नेतृत्वाखाली चारी बाजूने तोफा लावून मंदिर उध्वस्त केले. बाबर एवढ्यावरच थांबला नाही, तर मस्जिदसाठी बनवलेल्या विटामधे त्याने पाण्याऐवजी त्यांच्याच रक्ताचा वापर केला. ही पवित्र अयोध्या किती रक्ताने रंगली असेल यावरून त्याची कल्पना येईल.

राम मंदिरासाठी लढा आणि संघर्ष ही तर याची केवळ मुहूर्तमेढ होती. कोणत्याही परिस्थितीत राम मंदिर पुन्हा उभे राहिले पाहिजे यासाठी या संघर्षाची कहानी पुन्हा सुरू झाली. प्रभू रामचंद्राची भूमी अशा पद्धतीने अपवित्र व्हावी हे आसपासच्या गावांना सहन झाले नाही. आमचे पूर्वज महर्षि भरद्वाज होते. त्यांच्या श्रद्धास्थानाचे अशा रीतीने विटबंन व्हायला नको होते. या जाणिवेतून देवीदास पाण्डेय यांनी आसपासच्या गावातील लोकांमधे नवी स्फूर्ति, नवी चेतना भरली आणि ९० हजारांची फौज निर्माण केली. ५ दिवस हे युद्ध अहोरात्र चालले. पण फितुरीने घात केला. या युद्धाचे नेतृत्व करणाऱ्या देवीदास पाण्डेय यांना त्यांच्याच अंगरक्षकाने विट फेकून मारली आणि घायाळ केले. ही संधी साधून मीर बांकीने अचूक नेम धरला आणि त्याच्या बंदूकीच्या गोळ्या देवीदास यांच्या छातीत घुसल्या. या ९० हजार सैन्यांच्या रक्ताची समिधा पुन्हा एकदा स्वाभिमानासाठी वाहिली गेली. राम मंदिरासाठी हे तिसरे समर्पण ठरले.

संघर्ष संपला नाही. ही तर जणू सुरुवात होती. कारण देवीदास यांच्या बलिदानानंतर अवघ्या १५ दिवसांतच हंसवरचे महाराज रणविजय सिंह यांनी केवळ २५ हजार सैन्य घेऊन बाबरच्या सैन्यावर हल्ला चढवला. १० दिवस हे युद्ध चालले. त्यात महाराज रणविजय सिंह धारातीर्थी पडले आणि हे २५ हजार सैन्य पुन्हा कापले गेले. राम मंदिरासाठी हे चौथे शिरकाण ठरले होते.

आपल्या पतीचा बदला आणि आराध्य दैवताची होत असलेली उपेक्षा पाहून रणविजय सिंहाची पत्नी जयराज कुमारी मैदानात उतरली. तिने ३ हजार लढाऊ स्त्रियांची पलटन तयार केली. सोबत स्वामी महेश्वरानंद यांनीही २४ हजार चिमटाधारी संन्याशाचे दल तयार केले आणि अयोध्येवर १० वेळा आक्रमण केले. यावेळी अयोध्येच्या गादीवर होता तो हुमायूं. या युद्धात जयराज कुमारीने हुमायुवर विजय मिळवला, पण तो विजय फार काळ टिकला नाही. हुमायुने एक महिन्यातच पुन्हा सर्व शक्तिनिशी प्रतीहल्ला केला. त्यात जयराज कुमारीसह २८ हजार सैन्य मारले गेले. आत्मसन्मासाठी हे पाचवे प्राणाचे पुष्प वाहिले गेले होते.

हा संघर्ष काही काळ स्थिर राहिला, पण बदल्याची भावना शांत झाली नव्हती. हुमायुनंतर अकबर सत्तेवर आला. शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून अकबरने ३ फुटाचे छोटे मंदिर बनवले, पण ते समाधानकारक नव्हतेच. कारण हे मुस्लिम वेळोवेळी जन्मभूमीची जागा अपवित्र करू लागले. या जाणिवेतून स्वामी बलरामचारी यांनी पुन्हा लढा द्यायचे ठरवले. यासाठी त्यांनी आदिवासी, भिल्ल, क्षत्रिय, ब्राह्मण, संन्याशी अशा सर्व प्रकारच्या लोकांचे एकत्रिकरण केले आणि अयोध्येवर २० वेळा आक्रमण केले. यात त्याने १५ वेळा विजय मिळवला. शेवटी त्यांनाही या मंदिरासाठी आपले बलिदान द्यावे लागले. बलिदानाचे हे सहावे सत्र होते.

अकबरच्या काळात छोटी मोठी बलिदानाची सत्रे चालूच होती. त्यानंतर शाहजहाँन सत्तेवर आला. याही काळात छोटे मोठे छुपे हल्ले होतच राहिले. पण योग्य नेतृत्व करणारे कोणी लाभले नाही ! म्हणून हे दोन कालखंड पुन्हा नोंद घ्यावी असे ठरले नाहीत. हा कालखंड साधारणपणे १५३० ते १५५६ पर्यंतचा होता. तरीही या काळात १० वेळा या राम मंदिरासाठी युद्ध झाल्याची नोंद आहे. ही सातव्या बलिदानाची यशोगाथा होती.

आपल्या सर्व जवळच्या नातलगांची हत्या करून १६५८ च्या आसपास औरंगजेब सत्तेवर आला.

इस्लामचा खंदा पुरस्कर्ता आणि एक क्रूरकर्मा शासक अशीच त्याची ख्याती होती. गादीवर येताच त्याने अयोध्येतील सर्व मंदिरे उध्वस्त करण्याचे आदेश दिले आणि क्षणात त्याची अंमलबजावणीही झाली. समर्थ गुरु रामदास स्वामी यांचे शिष्य वैष्णवदास यांच्या मात्र ते चांगल्याच जिव्हारी लागले. त्यांच्या नेतृत्वाखाली चिमटाधारी संन्याशाची फौज उभी राहिली. त्याने सुमारे ३० वेळा राममंदिरासाठी औरंगजेबसारख्या बलाढ्य शत्रूवर आक्रमण केले, पण एवढ्या बलाढ्य शक्तिपुढे यांचा निभाव लागणे शक्य नव्हते. या युद्धात सरदार गजराज सिंह, राजेपुरचे महाराजा कुंवर गोपालसिंह, सिसिण्डाचे ठाकुर जगदंबा सिंह सगळे मारले गेले. याच वेळी या भागातील अनेक आदिवासी राजपूत जमातीतील समाजाने शपथ घेतली, 'जोपर्यंत राम मंदिर निर्माण होणार नाही, तोपर्यंत पायात पादत्राण आणि डोक्यावर पगडी घालणार नाही.' आजही फैजापुर, जौनपुर आणि आजुबाजुच्या जिल्ह्यातील काही जमाती ते तत्व पाळत आहेत. अशा प्रकारे आठव्यांदा सामूहिक प्राणाची आहुति देण्यात आली.

सन १६६० च्या काळात औरंगजेबच्या सत्तेला आव्हान दिलेले पाहून त्याने जांबाज खान याच्या नेतृत्वाखाली हजारो सैन्य अयोध्येवर आक्रमणासाठी पाठवले. मन हेलाऊन टाकणारा तो प्रसंग. लहान मुले, स्त्रिया, वृद्ध कशाचीही मुलाहिजा केली गेली नाही. यावेळी पुन्हा धावून आले ते बाबा वैष्णवदास महाराज. अल्प काळात त्याने साधू संन्याशाची फौज उभी केली. हा संग्राम उर्वशी कुंड या ठिकाणी झाला. पण बाबा वैष्णवदासला यश आले नाही आणि सर्व भगवाधारी प्रभू रामासाठी हुतात्मा झाले. हे नववे रक्तसिंचन होते.

सूड घेण्याची भावना अधिकच तीव्र होत होती. यातूनच १७६३ साली अमेठीचे राजा गुरुदत्त सिंह आणि पीपरपुरचे राजे कुमार सिंह यांनी पुन्हा संन्याशी आणि आजूबाजूच्या खेड्यातील सामान्य जनता यांना सोबत घेऊन ५ वेळा अयोध्येवर चाल केली. पाचव्या वेळी मात्र त्यांनी निर्णायक विजय मिळवला आणि विवादित जागी पुन्हा श्रीरामाच्या मूर्तिची स्थापना केली.

१७६४ च्या सुमारास औरंगजेबने पुन्हा अयोध्येवर हल्ला चढवला. यात १० हजार हिन्दूंची हत्या झाली. अयोध्या भूमी रक्ताने लाल झाली. याच राम मंदिरजवळ कंदर्पकूप नावाची एक विहीर होती. औरंगजेबने ही सर्व प्रेते या विहीरीत टाकून बाजूने मोठी भिंत बांधली आणि त्यास नाव दिले 'गज शहीदा' एवढे होऊनही हिन्दू शमला नाही. प्राणाची पर्वा न करता तेथेच रामनवमी साजरी करण्यास सुरवात केली.

१६८० साली शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंह आणि बाबा वैष्णवदास यांनी श्रीराम जन्मभूमीवर पुन्हा अधिकार मिळवण्यासाठी नव्याने सैन्य निर्माण केले आणि अयोध्येवर हल्ला चढविला. अयोध्येवर विजयही प्राप्त केला पण मंदिर निर्माण करण्याआधीच त्यांना पुन्हा पराभव स्वीकारावा लागला..

पुढील काही काळातच ब्रिटिश सरकार सत्तेवर साले आणि हिंदुस्थानवर एक हाती हुकूमत सुरू झाली. याही काळात राम मंदिरसाठी संघर्ष झाला नाही असे नाही. पण तो थोपवण्यात ब्रिटिश सरकारला यश आले असे म्हणता येईल. कारण १८५३ मधे हिन्दू-मुस्लिम यांच्यात ज्या प्रकारच्या दंगली उसळल्या त्या शमविण्यासाठी आतील बाजूत मुस्लिम आणि बाहेर हिन्दू समुदायास पूजा करण्याची अनुमती या ब्रिटीश सरकारकडून दिली गेली.

पुढे २५ मे १८८५ साली रघुवर दास यांनी राम जन्मभूमी अधिकारासाठी ब्रिटिश कोर्टात अपील दाखल केली, पण त्यांच्या प्रयत्नास फारसे यश आले नाही. कारण परिस्थिति 'जैसे थे' च राहिली.

१९३४ साली पुन्हा हिन्दू-मुसलमान दंगे झाले. या वेळी हिन्दू समाज इतका आक्रमक झाला की चार दिवसात त्यांनी बाबरी मस्जिद आपल्या ताब्यात घेतली आणि तेथे श्रीरामाची मूर्ति स्थापन केली. तेंव्हापासून या मस्जिदीत कधीही मुस्लिम नमाजसाठी फिरकले नाहीत.

१९४७ साली हिंदुस्थान स्वतंत्र झाला. त्याचबरोबर धर्माच्या आधारावर देशाची फाळणी सुद्धा झाली. कट्टर इस्लामवादाचा पुरस्कर्ता जीना यांच्या प्रयत्नातून स्वतंत्र इस्लामी राष्ट्र पाकिस्तान उदयास

आले. राहिला तो हिंदूंचा हिंदुस्थान... आता राममंदिर निर्माणचा मार्ग मोकळा झाला, अशीच श्रीराम भक्ताची धारणा होती. त्यातून ५ डिसेंबर १९५० साली महंत परमहंस रामचंद्र दास यांनी विवादित क्षेत्रात पुन्हा प्रभू रामचंद्राची मूर्ति स्थापन करण्यासाठी कोर्टात जनहित याचिका दाखल केली. त्यावेळी मात्र फैजाबाद जिल्हा न्यायालयाने विवादित क्षेत्र हिंदूंना पूजाअर्चासाठी खुले व्हावे असे आदेश दिले. देश स्वतंत्र झाला खरा, पण प्रभू रामचंद्राचा वनवास मात्र अजून संपला नव्हता.

मध्यंतरीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक नवी हिन्दू शक्ति उदयास आली होती. त्यातून विश्व हिंदू परिषद अस्तित्वात आली आणि श्रीराम मंदिर निर्माण मुद्दा त्यांनी अधिक आक्रमक केला. सगळ्यांचा नामोल्लेख करणे शक्य नाही, पण विश्व हिंदू परिषदेचे असंख्य कार्यकर्ते, अनेक संत महंत यांनी राम मंदिर मुद्दा उचलून धरला.

याचे पडसाद म्हणून १९७७ साली अयोध्येत खोदकाम सुरु झाले. हे खोदकाम नि:पक्षपातीपणे व्हावे म्हणून एक समिति स्थापन केली. त्यात सरकारी अधिकारी, हिन्दू, मुस्लिम, महंत असे सगळ्या प्रकारचे सामिल होते. त्यात हिन्दू अधिकारी बी.बी.लाल तर मुस्लिम अधिकारी के.के.मोहम्मद यांचा प्रमुख समावेश होता. हे खोदकाम करत असताना असे १४ खांब मिळाले की ज्यावर अनेक देवी देवतांची चित्रे कोरलेली होती. येथे पूर्वी राम मंदिर होते याचा हा भक्कम पुरावा होता.

पहिला टप्पा संपल्यावर पुन्हा खोदकाम हाती घेण्यात आले यावेळी नेतृत्व करत होते ते डॉ. बी. आर. मनी. यावेळी विवादित जागेवर पुन्हा ८४ खांब आढळून आले.

१९८६ साली फैजाबाद जिल्हा न्यायालयात पुन्हा जनहित याचिका दाखल करण्यात आली. या वेळी प्रथमच कोर्टाने हिन्दू धर्मियांना विवादित क्षेत्रात पूजा करण्यास परवानगी दिली. श्रीराम मंदिर निर्माण निर्णयाबाबत मात्र जैसे थे परिस्थिती ठेवली.

३० सप्टेंबर १९८९ पासून विश्व हिंदू परिषदच्या नेतृत्वाखाली रामशिला पूजन यात्रा काढण्यात आली. यात अनेक दिग्गज कार्यकर्ते सामिल झाले. त्यातून प्रकरण अधिकच आक्रमक बनले. यात आकडेवारी नुसार ३ लाख गांवे आणि ११ कोटी लोकांचा सहभाग नोंदविला गेला.

१९९० साली कारसेवा समिति स्थापन करण्यात आली. या समितीच्या नेतृत्वाखाली सोमनाथ ते अयोध्या अशी राम रथ यात्रा काढण्यात आली. या रथ यात्रेत देशभरातून सुमारे ८ लाख कारसेवक सहभागी झाले होते. अयोध्येला पोहचण्यापूर्वीच अनेक प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. कारसेवकांवर गोळीबार करण्यात आला. यात किती मुत्युमुखी पडले याचा अधिकृत आकड़ा उघड़ केला नाही. हजारो कारसेवक यावेळी जखमी झाले होते.

१९९१ साली पुन्हा सुमारे २५ लाख कारसेवकांनी श्रीराम जन्मभूमी मंदीर निर्माणसाठी आंदोलन उभारले. या वेळीही दोन वेळा गोळीबार करण्यात आला. यात कित्येक जण मृत्युमुखी पडले.

२ डिसेम्बर १९९० उत्तर प्रदेश सरकार मुलायमसिंह यादव यांनी वचन देऊनही कारसेवकांवर बेछूट गोळीबार केला. श्रीराम भक्तांना जितके दाबण्याच्या प्रयत्न केला जात होता तितकीच त्यांची भावना अधिक उफाळून येत होती. वास्तविक पाहता स्वतंत्र हिन्दुस्थानात हे लज्जास्पदच म्हणावे लागेल. आजवर समोर असणाऱ्या शत्रूशी लढल्याची यशोगाथा होती, तर आता स्वकियांशी झुंज देण्याची कर्मकहाणी होती. मुठभर मतांच्या पोटगीसाठी हिंदूंनी हिंदूशी धरलेले हे वैर होते. हीच मोठी शोकांतिका होती.

३ डिसेम्बर १९९२ साली पुन्हा ३ लाख कारसेवक अयोध्येच्या दिशेने कुच झाले. यावेळी मात्र आक्रोश अधिकच उफाळून आला होता.

६ डिसेंबर १९९२ रोजी पोलिस बंदोबस्ताला न जुमानता, प्राणाची पर्वा न करता हजारो कारसेवक बाबरी ढाच्यावर चढले आणि ५०० वर्षाचा जहरी कलंक पुसत काही क्षणात बाबरी ढांचा जमीनदोस्त केला. स्वतःच्या भूमीत, स्वतःच्या राष्ट्रात अशा प्रकारे संघर्ष करायला लागावा ही तर इतिहासातील मोठी शोकांतिका होती. आपलेच वैरी बनले होते. इथे रावण

एक नव्हता तर असंख्य होते.

शेवटचे बलिदान ठरले ते २७ फेब्रुवरी २००२ साली. अयोध्येकडून अहमदाबादकडे येणाऱ्या साबरमती एक्सप्रेसवर अज्ञात हल्लेखोंरानी हल्ला केला. या एक्सप्रेसमधे २००० च्या आसपास कारसेवक बसले होते. पूर्व नियोजित कट करून एक्सप्रेसच्या काही बोगी पेटवण्यात आल्या. त्यात ६० च्या आसपास कारसेवक होरपळून निघाले. याचीही नोंद असणे गरजेचे वाटते.

रामभक्तांचे कार्य इथे संपले नव्हते. येथून पुढे सुरू होते ती न्यायालयीन लढाई. १९९२ ते २०१९ पर्यंत राम जन्मभूमी खटला अधिकच रंगत गेला. अगदी 'राम कल्पनिक चरित्र आहे' इथपर्यंत मजल गेली. तब्बल तीन दशके ही न्यायालयीन लढाई चालू राहिली आणि या लढाईचा गोड अंत झाला तो ९ नोव्हेंबर २०१९ ला. या दिवशी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले की विवादित क्षेत्र ही श्रीराम जन्मभूमीच होती. तिथे हिन्दूंचे अस्थाकेन्द्र असलेल्या राम मंदिराचे पुन्हा निर्माण व्हावे ! तो क्षण म्हणजे ५०० वर्षाच्या संघर्षाचा अभूतपूर्व विजय होता ! हा ऐतिहासिक विजय बहाल केला नव्हता, तर तो मिळवला होता !

५ ऑगस्ट २०२० हाच तो मंगल दिवस. लाखो राम भक्तांच्या बलिदानाचे सार्थक ठरलेला क्षण ! अर्थात भव्य राम मंदिर निर्माणसाठी झालेले भूमीपूजन. एका डोळ्यात आनंद, तर एका डोळ्यात अश्रू असा तो भावनाविवश क्षण ! कारसेवकांच्या रूपाने अनेक यातना भोगलेल्या कार्यकर्त्यांचे स्वप्न साकार झाल्याचा हा क्षण ! गेली पाच सहा शतके लाखो हिंदूंच्या त्या विजयी गाथेचे सार्थक होत असलेला हा क्षण...!

शेकडो वर्षांच्या बलिदानाच्या पायावर दिमाखात उभे राहिलेले हे मंदीर केवळ श्रीराम मंदीर नाही, तर ते या देशाचे राष्ट्रमंदीरही आहे. केवळ आस्थाच नव्हे, तर येथील घुमणारा घंटानादही त्याग आणि समर्पणाचा इतिहास सांगेल. २२ जानेवारी २०२४ (सोमवार, पौष शुद्ध द्वादशी, शके १९४५) रोजी या अयोध्येतील श्रीराम जन्मभूमीच्या मंदिराची प्राणप्रतिष्ठा होत आहे आणि आपण सारे या मंगल प्रसंगाचे साक्षीदार होत आहोत.

इतिहास साक्षीदार आहे. रणांगणाचा यज्ञकुंड करून प्राणाची आहुति देण्याचा जीवघेणा खेळ वर्षानुवर्षे खेळला जातोय तो याच भूमीत. कशासाठी ही प्राण देण्याची स्पर्धा? स्वतःसाठी नव्हे, तर स्वत्वासाठी...! कधी या भूमीचे, कधी धर्माचे, कधी राष्ट्राचे, तर कधी अस्मितेचे संरक्षण करण्यासाठी. याच कारणासाठी ही भूमि सदैव रक्तरंजित राहिली. जेथे नरच नव्हे, तर नारीही हातात शस्त्र घेऊन लाखोंच्या शत्रूवर तुटून पडू शकते. अशी ऐतिहासिक उदाहरणे प्रेरणा म्हणून ठेवली जातात ती याच भूमीत. अशा भूमीचा भूमीपुत्र जेंव्हा स्वार्थ बुद्धीने फितूर होऊन प्रश्न उभा करतो, अशावेळी नेत्रात अंगार टाकून त्यांची झापडे उघडी करावीच लागतात.

प्रस्तुत लेख लिहिताना संघर्षाच्या उत्तरार्धाची लेखात फारशी नोंद केली नाही. कदाचित त्याकडे राजकीय वक्रदृष्टीतून पाहिले जाईल. किंबहुना आज अनेक जण त्याचे साक्षिदारही असतील. हा विजय म्हणजे समस्त हिन्दूचा विजय आहे. कारण जे लढले, झगडले ते हिन्दू म्हणून ! कशासाठी? तर हिन्दू अस्मितेसाठी.

प्रस्तुत इतिहासाच्या नोंदी २००५ च्या आसपास टिपून ठेवल्या गेल्या होत्या. त्यासाठी अनेक जुन्या पुस्तकांचा आधार होता. समग्र लिहायचे ठरले तर कितीतरी खंड निर्माण होतील. काही शेष राहिलेही असेल. त्या बाबत दिलगिरी ही व्यक्त करतो.

कदाचित प्रश्न पडेल की एवढ्या वर्षानंतर आज का सुचले? तर त्याचेही कारण आहे. हिन्दूवासीयांनो, खरे तर आव्हाने अजून बरीच आहेत. काशी विश्वेश्वर परिसर आणि ज्ञानवापी मस्जिद, मथुरा, भोजशाळा अशी अनेक पवित्र क्षेत्रे आहेत, जी अजूनही वर्षानुवर्षे मिनारखाली गुदमरून पडली आहेत. त्यांची मुक्तता करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हिन्दू संघटन. आजची परिस्थिती पाहता येणारा काळ किती भयानक असेल त्याची कल्पना न केलेली बरी.

खरे तर येथील समाज हिन्दू- यातील काही

आज स्वतःला पृथक समजत असेल तरीही काही राष्ट्रविघातक समूह आज समाजात अलगपणाची बीजे रुजविण्याचा प्रयत्न करत आहे. दुर्दैवाने आमचा समाज अंधपणे त्यास बळीही ठरत आहे. हिन्दू केवळ धर्म नाही तर संस्कृती आहे. जिने आजवर हा हिन्दू समाज विविधता असूनही एकसंध बांधून ठेवला आहे. आज हीच संघटीत भावना राष्ट्राचे बलशाली केंद्र आहे. या दुष्ट प्रवृत्तीकडून या संघटीत भावनेवरच आघात केला जात आहे. त्यासाठी, जातिवाद, प्रांतवाद, वर्णवाद, अशा संकुचित अस्मिता जागृत केल्या जात आहेत. या भूलथापांना बळी पडून आम्ही आमचे स्वत्व गमावून बसत चाललो आहे. बाबरने फक्त मंदिर उध्वस्त केले. आज ते उभेही राहिले. पण हिन्दू ऐक्य नष्ट झाले, तर गल्लोगल्ली असे अनेक बाबर निर्माण होतील.

आज काही निर्लज्जांकडून प्रश्नही उपस्थित होत आहे की, कशासाठी मंदिराचा एवढा अट्टहास? तर मी एवढेच म्हणेन की, काही बाबी या राष्ट्राच्या आत्मसन्मानाच्याही असतात. विरोधासाठी विरोध करून आपली राजकीय पोळी भाजणारे करंटे येथे काही कमी नाहीत. यांना हिन्दू म्हणावे की हिंदूंना लागलेला कलंक म्हणावे तेच समजत नाही.

राम मंदिर निर्माण हा केवळ आस्थेचा विजय नाही तर एक अभूतपूर्व संघर्षाचा विजय आहे. धार्मिक हिंदुस्थानचे धार्मिक अधिष्ठान, परंपरा, संस्कृती आणि लाखो बलिदानाची ती यशोगाथा आहे. ५०० वर्षे रक्ताने लाल झालेली ही शरयू नदी आज खऱ्या अर्थाने आनंदाश्रू वाहत असेल. आजवरच्या या रक्तरंजित इतिहासाची ती साक्षीदार होती. सांस्कृतिक राष्ट्र म्हणून जशी या हिंदुस्थानची ओळख आहे, तशीच ही योध्यांचीही भूमी आहे याचा विसर न पडावा. केवळ पराक्रमच नव्हे, तर वेळप्रसंगी त्याग आणि बलिदान देण्यासही येथील समाज मागेपुढे पाहत नाही. हेच या भूमीचे सत्व आणि तत्व आहे. यातूनच ही राम मंदिराची आकांक्षा.

तरीही एक प्रश्न पडतोच. राजकीय उल्लेख नकोच पण ओघाने येतोच. आज या देशात अनेक हिंदुत्ववादी विचारधारा घेऊन दिवसरात्र झटणारे, झिजणारे कार्यकर्ते आहेत. कोणी त्यांना ठराविक राजकीय पक्षाचे चेले म्हणत असतील, पण विचार केला तर राजकीय समिकरणे वाढीस लागली ती आत्ता, या पाच सहा दशकात. पण आत्मउन्नत्तीची आणि स्वाभिमानाची ज्योत अखंड तेवत आहे ती गेल्या दोन हजार वर्षापासून. ज्याला तुम्ही काही जण म्हणत असाल, त्या काही जणांच्या त्याग आणि परिश्रमातून हे राष्ट्र आजही तितक्याच जोमाने उभे आहे. लक्षात ठेवा, कळत नकळत कोणीतरी तुमच्याही वाट्याची लढाई लढत असतील. त्यांना साथ देणे हेही धर्म कर्तव्यच. केवळ हिंदू म्हणून आणि म्हणूनच हे राष्ट्र सुरक्षित आहे..

विपरीत परिस्थितीशी मुकाबला करून हा राष्ट्रसन्मान पुन्हा मिळवणे हा तर येथील दिव्य वारसा. अगदी मौर्यकाळ, विक्रमादित्य काळ, त्यानंतर छत्रपति शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा काळ याची साक्ष देईल. आम्हाला सहजच काही गोष्टी प्राप्त होतच नाहीत. लढा आणि संघर्ष जणू या मातीचा गुणधर्म बनला आहे. पण मुळात शत्रूचे हे इस्पीत का साध्य होते? तर षंढ आणि गद्दार रक्त येथे आजही नवनवीन चेहरे घेऊन उदयास येते. ही सुद्धा या भूमीची शोकांतिका.

असो, भविष्यात अनेक आव्हाने पेलायची आहेत. जेंव्हा आत्मविस्मृति होईल तेंव्हा पूर्वजांचे पराक्रम, त्याग, बलिदान आठवावे. तोच भूतकाळ पुन्हा नवसंजीवनी निर्माण करून नव्या आव्हानासाठी सज्ज राहण्यास प्रेरणा देईल. लक्षात ठेवा, राष्ट्रउद्धारासाठी हिन्दू ऐक्यशिवाय पर्याय नाही.

**पिढ्यापिढ्याच्या संघर्षातून**
**झाला महाविजय साकार..!**
**गुढी उभारा दिग्विजयाची**
**श्रीरामाचा जय जयकार..!!**
**।। सियावर रामचंद्र की जय ।।**

**देशप्रेमी – संपत कौदरे** (पुणे – महाराष्ट्र)
मोबा. ८८८८९३१२१९

# कलेच्या मुक्त उधळणीत रंगला चित्पावन कला महोत्सव
# 'चित्पावन संघ - वुई फॉर अवर्स'तर्फे महोत्सव





कोल्हापूर : राम भक्तीमध्ये तल्लीन करणारी भावभक्ती गीते, शास्त्रीय नृत्यापासून ते मनात जल्लोष वाढवणारे अत्याधुनिक डान्स, वादनाबरोबरच अंगभूत कलांचे सुयोग्य सादरीकरण अशा कलेच्या मुक्त उधळणीत रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते व्ही. टी. पाटील सभागृह येथे शनिवारी आयोजित पहिल्या चित्पावन कला महोत्सवाचे ! हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि वुई फॉर अवर्स ग्रुपतर्फे आयोजित या महोत्सवाला प्रमुख उपस्थिती डॉ. नंदकुमार जोशी, डॉ. गजानन गणपुले, सीए विकास परांजपे, अध्यक्ष मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांची होती. स्वागत संयोजक महेश पटवर्धन यांनी केले. महोत्सवाचा शुभारंभ भगवान परशुराम, करवीर निवासिनी महालक्ष्मी आणि आई योगेश्वरीच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. सूत्रसंचालन प्रिया देसाई यांनी केले.

या महोत्सवात चित्पावन ब्राह्मण समाजातील तरुण-तरुणी, बालकलाकार, ज्येष्ठ कलाकार यांनी आपल्या अंगभूत कलेचा आविष्कार सादर केला. अगदी वयोगट ९ पासून ते ७७ वयापर्यंतच्या कलाकारांची कला हे या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. कार्यक्रमाची सुरुवात रेवा आणि ज्येष्ठा परेश गाडगीळ यांच्या गीतरामायण गीताने झाली. त्यामुळे संपूर्ण सभागृह भक्तीरसात न्हाऊन निघाले. बालशाहीर अर्णव पेंडसे याने बाजीप्रभू यांचेवर सादर केलेला पोवाडा प्रत्येकाच्या मनामध्ये राष्ट्रप्रेमाची ज्वाला पेटवून गेला. ७७ वर्षीय डॉ. प्रतिभा खरे यांनी कराओकेवर गायलेल्या गाण्याने सर्वांनाच डोलायला लावले. नृत्य प्रकारात सावनी बेहेरे, मुग्धा पटवर्धन, ऋत्वी पटवर्धन, वेदा आपटे, नेत्रा काळे, मृण्मयी करंदीकर यांनी सहभाग नोंदवला. वाद्यगायनामध्ये तुषार दिवेकर, मीरा भावे, आरती गणपुले, वृषाली पटवर्धन, मुक्ता गोगटे, स्वरा जोशी, अमित आपटे यांनी कला सादर केली. कराओकेमध्ये शोभा गोखले, चंद्रकांत बापट (वय ६७) यंनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. इन्स्ट्रूमेंटल प्रकारात अथर्व गणपुले (हार्मोनियम), महेश आपटे (गिटार), शुभम साने (ढोलकी) यांनी सादरीकरण केले. प्रशांत करंदीकर या तरुणाने शिट्टीवरील गाणे सादर करत वेगळा आविष्कार सादर केला. कलाविष्काराची सांगता पालवी ग्रुपच्या श्रीराम मंदिर प्रतिष्ठापना सोहळ्यावर आधारीत नृत्याविष्काराने करण्यात आली. त्यामध्ये सौ. अपूर्वा केळकर, सौ. समीक्षा सोमण, सौ. गौतमी जोग, सौ. नम्रता गाडगीळ, सौ. अनघा पटवर्धन, सौ. मधुरा गाडगीळ यांनी सहभाग घेतला होता. सर्वच सहभागी कलाकारांना गौरव चिन्ह आणि बक्षिस देवून गौरवण्यात आले.

त्यानंतर बालचमूंनी श्रीरामाचा जयजयकार केला. यावेळी संयोजक महेश पटवर्धन स्वागतपर भाषणात म्हणाले, 'चित्पावन संघाच्या हीरकमहोत्सवानिमित्त वुई फॉर अवर्स या चित्पावन तरुणांच्या ग्रुपने या पहिल्याच कलामहोत्सवाचे आयोजन केले. पहिल्याच वर्षी २५० पेक्षा जास्त बंधू-भगिनींनी उपस्थिती लावून चित्पावन एकी अधोरेखित केली.' अध्यक्ष मकरंद करंदीकर म्हणाले, 'कोल्हापूर चित्पावन संघाच्या या कार्यक्रमाचे यश पाहता भविष्य उज्ज्वल वाटत आहे. वुई फॉर अवर्स ग्रुपने महोत्सवाचे यशस्वी संयोजन करून आपल्या तरुणांच्या नेतृत्व गुणाचे दर्शन घडवले आहे.' उपाध्यक्ष प्रसाद भिडे म्हणाले, 'कोल्हापूर चित्पावन संघाने हरीकमहोत्सवानिमित्त गेल्या वर्षीपासून अनेक कार्यक्रम हाती घेऊन ते यशस्वी केले. यामध्ये नुकतेच झालेला धुंदुरमास सोहळा, गतवर्षीचा अष्टमी जागर सोहळा हा मोठ्या उत्साहात आणि मोठ्या संख्येने झाला. हा कला महोत्सवही यशस्वी झाल्यामुळे नक्कीच दरवर्षी याचे आयोजन केले जाईल. त्यामुळे चित्पावन मुला-मुलींच्या कलेला वाव मिळेल.' आभार वृषाली पेंडसे यांनी मानले.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024

ISO 9001-2008
UL Approved

# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.